


**About Us: http://www.galaxyimrj.com/about-us/**
**Archive: http://www.galaxyimrj.com/archive/**
**Contact Us: http://www.galaxyimrj.com/contact-us/**
**Editorial Board: http://www.galaxyimrj.com/editorial-board/**
**Submission: http://www.galaxyimrj.com/submission/**
**FAQ: http://www.galaxyimrj.com/faq/**

# २१ व्या शतकातील आदिवासी कादंबरी

डॉ. सुलतान पिरू पवार
सहयोगी प्राध्यापक,
मराठी विभाग,
जी.टी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
नंदुरबार.

सारांश:

१९७५ च्या आसपास मराठी साहित्य क्षेत्रात आदिवासी साहित्यप्रवाहाकडे एक महत्त्वाचा साहित्यप्रवाह म्हणून पहिले जाते. आदिवासी कविता संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या समृद्ध होत आहे. मात्र कवितेच्या मानाने आदिवासी कथा, नाटक आणि कादंबरी हे साहित्यप्रकार मागे पडले आहेत. विसाव्या शतकात अनेक साहित्यकारांनी कादंबरीतून आदिवासी विश्व साकार केले आहे, त्यात आदिवासी लेखकाच्या केवळ तीनच कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. २१ व्या शतकात मात्र अनेक आदिवासी साहित्यकार कादंबऱ्यांची रचना करू लागले. त्यात प्रामुख्याने ‘कोळवाडा’, ‘भिवा फरारी’, ‘डुबू डुबुंग च्याय च्याय’, ‘बाडगीची माची’, ‘पळसचोंड’, ‘पाड्यावरचा टिल्ल्या’ ‘मासोली’, ‘शिबली’, ‘कोयतूर’, ‘घोंगडा’, ‘इधोस’ या कादंबऱ्यांचा समावेश होतो.

२१ व्या शतकातील आदिवासी कादंबरीतून आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक जगण्याबरोबरच त्यांचे आर्थिक, शैक्षणिक जीवनही प्रकट झाले आहे. जागतिकीकरण, आधुनिक जीवनाच्या स्वीकारामुळे आणि कालौघात बदलत्या परिस्थितीत आदिवासी परिसरात, त्यांच्या जीवनात होत असलेल्या आर्थिक विकासाबरोबरच त्यांचे सांस्कृतिक, भाषिक जीवन व त्या निमित्ताने हरवत गेलेली आदिवासींची जीवनमूल्ये, निसर्गनिष्ठ जीवनशैली व लोकपरंपरा या गोष्टी नाहीशा होऊ लागल्याचे संदर्भ या कादंबरीतून व्यक्त झाले आहेत. आदिवासींचे बदलते जीवन, त्यांच्या समस्या, त्यांचे अस्तित्व, अस्मिता, त्यांच्या मूळ परंपरा याविषयी येत्या काळात

कादंबरीतून आविष्कार होणे आवश्यक आहे, त्या दृष्टीने आदिवासी साहित्यकारांनी मोठ्या संख्येने कादंबरीची रचना करणे आवश्यक आहे.

प्रस्तावना -

१९६० नंतर दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य चळवळींच्या काळातच आदिवासी साहित्य चळवळ सुरू झाली आणि आदिवासी साहित्याचा गांभिर्याने विचार सुरू झाला. आदिवासी साहित्यिक आपल्या काव्यातून ठामपणे स्वतंत्र भूमिकेबरोबरच आदिवासींची वेगळी जीवनशैली, त्यांची अस्मिता, त्यांच्या जीवनातील वास्तवचित्र, त्यांची सभ्यता आणि प्रस्थापित शोषक व्यवस्थेच्या विरोधातील बंडखोरी यांची मांडणी करू लागले. मात्र आदिवासी कवितेच्या गुणात्मक आणि संख्यात्मक वाढीबरोबर आदिवासी साहित्यिकांनी इतर साहित्य प्रकारांकडे दुर्लक्ष केल्यामुळे आदिवासी कादंबरी, नाटक, कथा या साहित्यप्रकाराचा विस्तार होऊ शकला नाही.

भारतीय स्वातंत्र्यानंतर आपल्या समूहनिष्ठ मौखिक वाङ्मयाबरोबरच शिक्षित आदिवासींनी आपल्या साहित्य लेखनातून त्यांचे जीवन रेखाटायला सुरुवात केली. आदिवासींच्या सभोवतालच्या समृद्ध निसर्गाचे, त्यांच्या जीवनसंघर्षाचे, व्यथावेदनेचे, पारंपरिक रूढीपरंपरेचे, त्यांच्यावरील अन्याय-अत्याचाराचे, त्यांच्या संपन्न जीवनमूल्यांचे, त्यांच्या हक्क-अधिकारांचे चित्रण करणारे हे साहित्य निर्माण व्हायला सुरुवात झाली. त्यांना डोंगरदऱ्यात हाकलून देणाऱ्या प्रस्थापित वर्णव्यवस्था-जातव्यवस्थेविषयीचा विद्रोह त्यातून प्रकट होऊ लागला आहे. आणि स्वतःच्या Identity चा शोध घेणारी त्यांची जाणीव, आत्मभानाची भावना, त्यांची अस्मिता जागी करण्याचे भान आदिवासी साहित्यातून आविष्कारीत होऊ लागले. अनेकविध प्रेरणास्रोतांचा स्वीकार करून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि आगळ्यावेगळ्या जीवनाचा, त्यांच्या संघर्षाचा, त्यांच्या दुःखाचा, त्यांच्या वेदनेचा, त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराचा, त्यांच्या संपन्न लोकपरंपरेचा आविष्कार करण्यासाठी आदिवासी साहित्याची रचना होऊ लागली. साहित्यलेखनाबरोबर साहित्याच्या प्रचार व प्रसारासाठी, साहित्यविषयक जाणिवा विकसित करण्यासाठी, साहित्याभिरूची निर्माण करण्यासाठी आदिवासी लेखकांनी साहित्य चळवळ निर्माण

करून आदिवासी साहित्याची एक वैशिष्ट्यपूर्ण आणि ठाम भूमिका मांडली. त्यातून उतरोत्तर काळात आदिवासी साहित्याचा प्रवाह भक्कमपणे सुरू झाला.

आदिवासी साहित्य -

आदिवासी साहित्य हे रानावनात, डोंगरदऱ्यात प्रदीर्घ काळ वास्तव्य करणाऱ्या आदिवासींचे साहित्य होय. आदिवासींनी निसर्गरम्य वातातरणात एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती निर्माण केली. त्या निसर्गातील संस्कृतीचे साहित्य म्हणजे ‘आदिवासी साहित्य’ होय. प्रस्थापित व्यवस्थेने त्यांना दूर डोंगरदऱ्यांमध्ये राहण्यास भाग पाडून त्यांच्यावर अन्याय केला. शेकडो पिढ्या जंगलांमध्येच खर्ची पडल्या. परंतु त्यांना न्याय मिळाला नाही. आदिवासी साहित्याचे अभ्यासक डॉ.विनायक तुमराम आदिवासी साहित्याविषयी आपले विचार मांडतांना लिहितात की, “आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे साहित्य होय. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत, अशा दुर्लक्षितांचे हे साहित्य आहे. ज्यांच्या आक्रोशाला इथल्या सावत्र समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही, अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांतिसाहित्य होय. इथल्या क्रूर कठोर न्यायव्यवस्थेने ज्यांच्या शेकडो पिढ्यांना आजीवन वनवास ठोठावला त्या आदिवासी समूहांचे ते मुक्तिसाहित्य होय. आदिवासींचे घायाळ आयुष्य ज्या संस्कृतीच्या कुसाआड राहिले, त्या संस्कृतीच्या प्राचीन इतिहासाला कुळारंभ देणारे हे साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे या भूमीने प्रसविलेल्या आदिम वेदनेच्या जाणिवेचे शब्दरूप होय.”[१] शेकडो वर्षे रानावनांत खितपत पडलेल्या, अन्यायित, वंचित आदिवासींच्या आक्रोशाचा आविष्कार म्हणजे आदिवासी साहित्य होय. आदिवासींची आदिम वेदना, त्यांच्या जाणिवा आदिवासी साहित्यातून प्रकटलेल्या आहेत. शेकडो वर्षांची विद्रोहाची भावना उचंबळलेली आहे. सत्ताकेंद्राला चिकटून बसलेल्या प्रस्थापित शासकांच्या विरोधात संघर्षासाठी उभे राहून मुक्तीसाठी धडपडणाऱ्या आदिवासींचे परिवर्तनशील साहित्य होय.

आदिवासी समाजाच्या संदर्भात भौगोलिक प्रदेश, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, धार्मिक स्थितीविषयी वास्तव जाणीव व्यक्त करणाऱ्या साहित्यास 'आदिवासी साहित्य' असे

म्हटले जाते. 'आदिवासी जाणीव' हा साहित्याचा प्रमुख विशेष मानला जातो. निसर्गाशी असलेले जैविक नातेसंबंध, समृद्ध लोकपरंपरा व लोकसंस्कृती, आदिवासींचे ऐतिहासिक कर्तृत्व, फुले-आंबेडकरी तत्त्वज्ञानाने निर्माण झालेल्या सामाजिक चळवळी, शोषकव्यवस्थेच्या विरोधात दिलेला आदिवासींचा लढा, ब्रिटीशांच्या विरोधात आदिवासींनी पुकारलेला विद्रोह, आदिवासींच्या धर्म-संस्कृतीवरील आक्रमण-अतिक्रमणाच्या विरोधात पुकारलेला आवाज, विषमताधिष्ठित व्यवस्थेच्या विरोधात केलेली बंडखोरी यामुळे आदिवासी लेखकांनी प्रेरणा घेऊन आदिवासी साहित्याची रचना करायला सुरुवात केली.

२० शतकातील आदिवासी कादंबरी -

साठोत्तरी मराठी साहित्यामध्ये कादंबरी हा साहित्यप्रकार आशयसंपन्नता आणि भाषिक अभिव्यक्तीतील वैविध्यता यामुळे समृद्ध आणि लोकप्रिय होत गेलेला आहे. याच काळात ग्रामीण कादंबरी आणि दलित कादंबरीही संपन्न होत गेलेली आहे. आदिवासी कादंबरीचा विकास मात्र खऱ्या अर्थाने झालेला दिसत नाही. याची अनेक कारणे सांगता येतात. पहिले कारण म्हणजे आदिवासी साहित्यिकांनी या साहित्यप्रकाराकडे साफ दुर्लक्ष केलेले आहे. दुसरे कारण म्हणजे आदिवासीएतर साहित्यिकांनी कादंबरी साहित्यप्रकारातून आदिवासी जीवन मांडण्याचा प्रयत्न केलेला असला तरी हा प्रयत्न फारच तोकडा आहे असे म्हणता येते. चांगल्या आणि यशस्वी कादंबरीकारांनी आदिवासी जीवनविश्व आपल्या कादंबरीचा विषय म्हणून स्वीकारला नाही. फार कमी लेखकांनी आदिवासींचे विश्व कादंबरीतून साकार केले. पण त्यांच्या लेखनात विशिष्ट प्रकारच्या विचारसरणीचे समर्थन करण्याचाच प्रयत्न झाला. फार कमी कादंबरीकारांनी आदिवासींचे जीवन निर्मळ भावनेने रेखाटन केलेले आहे. २० शतकात आदिवासीतर लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमध्ये साधारणतः 'वाडगीण', 'जैत रे जैत', 'झेलझपाट', 'आंदोलन', 'हाकुमी', 'एनकाऊंटर', 'पारध' या काही कादंबऱ्यांचा समावेश होतो. आदिवासी लेखकांनी २० व्या शतकाच्या शेवटी कादंबरीलेखनाला सुरुवात केली. त्यात 'तृष्णा' (नजुबाई गावित), 'वाडा' (प्रा.माधव सरकुंडे) आणि 'टाहो' (बाबाराव मडावी) या तीन कादंबऱ्यांचा समावेश होतो. म्हणजे

साधारणतः २५ वर्षांपूर्वी आदिवासी साहित्य चळवळ सुरू झाल्यानंतरही या पाव शतकात फक्त तीनच कादंबऱ्या आदिवासी लेखक लिहू शकले, यावरून आदिवासी कादंबरीकारांनी या साहित्य प्रकाराकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

आदिवासी कादंबरी संदर्भात फार थोड्या कादंबरीकारांनी प्रामाणिकपणे आदिवासी जीवनानुभव आणि त्यांच्या वास्तवदर्शी जीवनावर प्रकाशझोत टाकलेला आहे. त्यांच्या आदिवासी जीवनावरील कादंबरी लेखनामुळे मराठी कादंबरीच्या वैभवात भरच पडली आहे. तरीही आदिवासी कादंबरी गुणात्मक आणि संख्यात्मकदृष्ट्या मागे पडलेली आहे; मात्र त्या कादंबरीच्या आशयविश्वाच्या वेगळेपणाकडे दुर्लक्ष करता येत नाही. कादंबरी साहित्य प्रकारामध्ये मानवी जीवनाचा व्यापक अवकाश मांडता येतो. असंख्य पात्रे, मानवी जीवनातील असंख्य घटना-प्रसंग, व्यापक भूप्रदेशातील वैविध्य, मानवी समाजाच्या संस्कृतीचा प्रवाहणारा मोठा पट, मानवी जीवनातील व्यामिश्र गुंतागुंत, माणसाचा कधीही न संपणारा संघर्ष आणि शोध या साऱ्यांचा यामध्ये अंतर्भाव होतो. म्हणून ह्या साहित्य प्रकारातून शेकडो वर्षांपासून डोंगरदऱ्यांमध्ये वास्तव्य करणाऱ्या आदिवासींच्या जीवनातील अस्पर्शित लोकपरंपरा, त्यांचे भीषण आणि भयावह वास्तवचित्राचा आविष्कार कादंबरीकारांनी केलेला आहे. आदिवासी कादंबरी ही आशयविश्व आणि अभिव्यक्ती याबाबतीत निश्चितच वेगळी आहे; कारण आदिवासी समाजाची सभ्यता, त्यांची वेदना, त्यांचे सुख-दुःख, त्यांच्या जाणिवा, संवेदना, जगण्याच्या प्रेरणा, त्यांच्या जीवनातील संघर्ष, त्यांच्या जीवनातील पारंपरिक लोकपरंपरा, लोकतत्त्व, शेकडो वर्षांपासून होणारे त्यांचे शोषण, त्यांच्यावरील अन्याय-अत्याचार, त्यांची गीत-नृत्यादी परंपरा, जीवनमूल्ये आणि त्यांचा निसर्गाशी असलेला जैविक सहसंबंध या साऱ्यांमध्ये वेगळेपण आहे. देशातील इतर मानवी समुदाय किंवा समाजापेक्षा आदिवासी वेगळे आहेत, म्हणून त्यांचे वेगळेपण मांडणारी कादंबरी ही स्वतंत्र, वेगळी आणि महत्त्वाची आहे हे मान्य करावे लागते.

'तृष्णा' आदिवासींच्या तीन पिढ्यांचा मोठा अवकाश मांडणारी कादंबरी असून, त्यातून धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील मावची आणि भिल्ल या आदिवासी लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या

इसरी आणि आशाच्या जीवघेणा, खडतर जीवनसंघर्षाला अधोरेखित करत; आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे नानाविध व विविधांगी असलेले पदरही व्यक्त करते. आदिवासींच्या सबंध आयुष्याला चिरडणारी, उद्ध्वस्त करणारी, अस्वस्थ करणारी, पोखरणारी त्यांच्या जीवनातील भयकारी अभावग्रस्तता साऱ्या कादंबरीला व्यापलेली आहे. म्हणून कादंबरीतील आदिवासींचे जीवन काळवंडून जाते. आणि आदिवासी स्त्रीचे जगणे वाचकांना सुन्न करणारे ठरते. ‘वाडा’ या कादंबरीमधून यवतमाळ आणि नांदेड जिल्ह्याच्या परिसरातील आंध आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा पट उभा राहिलेला आहे. दहावीस आंध लोकांच्या वस्त्यांवर पाटलांचा प्रचंड धाक असतो. त्यांच्या वाट्याला गेलेल्या माणसाला उद्ध्वस्त व्हावे लागते. अशा निर्दयी, शोषक पाटलांच्या अत्याचारापासून सर्वसामान्य लोकांची सुटका करण्यासाठी बाज्या पाटलाचा खून करतो. या घटनेमुळे प्रस्थापित शोषणकारी व्यवस्थेचा अंत करून आंध आदिवासी समाजामध्ये एक प्रकारची अस्मिता, बंडखोरी निर्माण करण्याचा लेखकाचा विचार यातून प्रत्ययास येतो. ‘टाहो’ या लघुकादंबरीमध्ये जंगलामध्ये राहत असलेल्या आदिवासी जमातीचा जीवनसंघर्ष आविष्कारीत झालेला आहे. शोषण, दारिद्र्य, अंधश्रद्धा, कर्जबाजारीपणा यामुळे ग्रासलेल्या आदिवासींच्या जीवनामध्ये, भीमाचे राज्यघटना घेऊन गेल्यामुळे त्यांच्या जीवनात परिवर्तनाचा उजेड पडायला सुरुवात होते. शिक्षणामुळे माणसाच्या विकासाचा मार्ग खुला होतो, याची प्रकर्षाने जाणीव करून देणारी ‘टाहो’ ही कादंबरी आहे.

२१ व्या शतकातील आदिवासी कादंबरी -

२००० नंतर प्रामुख्याने बाबा भांड लिखीत ‘तंट्या’ या कादंबरीमध्ये ब्रिटिशांच्या विरोधात लढणाऱ्या तंट्या भिल्ल या आदिवासी जननायकाची कहाणी अभिव्यक्त झालेली आहे. उल्हास रहाणे यांच्या ‘रिंगण’ या वास्तववादी कादंबरीमधून वारली आदिवासी जमातीतील प्रथापरंपराचे चित्रण येते. कविता महाजन यांच्या ‘ब्र’ यामध्ये सह्याद्रीतील आदिवासी स्त्रियांचे वास्तव जीवनचित्र येते. अलका कुलकर्णी यांच्या ‘चकवा’ यामधून सातपुड्यातील आदिवासींच्या अंधश्रद्धांचे चित्रण झाले आहे. गो.ना. मुनघाटे यांच्या ‘माझी काटेमुंढरीची शाळा’ ह्या कादंबरीमध्ये

दुर्लक्षित, अस्पर्शित, ज्यांच्यापर्यंत आधुनिकतेची थोडीशी झुळूकही वाहिलेली नाही, अशा शैक्षणिक-आर्थिकदृष्ट्या अप्रगत परंतु सांस्कृतिकदृष्ट्या सुदृढ असलेल्या माडिया आदिवासी जीवनाचे वास्तवचित्र येते. अनिल साबळे यांच्या 'डहाण' या कादंबरीत आश्रमशाळेत शिकणाऱ्या आदिवासी मुलांच्या जीवनाचे वास्तववादी चित्रण आलेले आहे. आश्रमशाळेत स्वयंपाकी असलेला अंकुश नागरे हा कादंबरीचा नायक असून; आश्रमशाळेतील भ्रष्ट व्यवस्थेशी तो त्याच्या ताकदीने संघर्ष करीत राहतो. विस्कटलेल्या आणि स्वार्थाने बरबटलेल्या व्यवस्थेत मुलांसाठी शक्य तेवढे करण्याचा प्रयत्न करत राहतो. मुलांनी उपाशी राहू नये यासाठी धडपडत असतो. 'डहाण' कादंबरीतील आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वाईटस्थितीला कारणीभूत असणाऱ्या मग्रूर आणि भ्रष्ट व्यवस्थेमुळे अस्वस्थ करते.

आदिवासी साहित्यकारांचे कादंबरीलेखन -

२१ व्या शतकात आदिवासी लेखकांनी कादंबरी या साहित्यप्रकाराकडे लक्ष देत त्यातून आपले, समाजाचे जीवनानुभव मांडायला सुरुवात केली. आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक जीवनाचा वेध घेत; त्यांनी कादंबरीतून अभिव्यक्त करायला सुरुवात केली. अर्थात पाव शतकात जवळपास दहा-बारा कादंबऱ्याच प्रकाशित झाल्या, ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. या काळात प्रामुख्याने 'कोळवाडा', 'भिवा फरारी', 'डुबू डुबुंग च्याय च्याय', 'बाडगीची माची', 'पळसचोंड', 'पाड्यावरचा टिल्ल्या' 'मासोली', 'शिबली', 'कोयतूर', 'घोंगडा', 'इधोस' या कादंबऱ्यांचा समावेश होतो.

गोपाळ गवारी यांच्या 'कोळवाडा' या कादंबरीत नाशिक जिल्ह्यातील महादेव कोळी या आदिवासी जमातीचे चित्रण येते. लेखकाची ही आत्मचरित्रात्मक कादंबरी असून; लेखकानेच सांगितल्याप्रामाणे कादंबरीतील गोकुळ नावाची व्यक्तिरेखा स्वतः लेखक आहेत. आणि कादंबरीतील इतर अनेक व्यक्तिरेखाही लेखकाच्या नात्यातल्या, ओळखीच्या व्यक्तींवरून रेखाटल्या आहेत. या कादंबरीतून आदिवासींच्या प्रथापरंपरा, आदिवासींची जीवनशैली, त्यांचे सणोत्सव, लग्नप्रथा, त्यांच्या देवदेवतांच्या कल्पना असे अनेक संदर्भ अभिव्यक्त झालेले आहेत. त्यासोबतच

आदिवासींच्या जीबानातील दारिद्र्य, त्यांची उपासमारी, जगण्यातील संघर्ष चित्रित झालेला आहे. कादंबरीमध्ये अनेक व्यक्तिरेखांच्या संवादातून बोलीभाषेचा अविष्कार झालेला आहे.

नजूबाई गावित यांच्या ‘भिवा भरारी’ ही कादंबरी भिवा नावाच्या व्यक्तिरेखेभोवती केंद्रित झालेली आहे. ब्रिटिश सरकार आणि सावकार यांच्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात भिवा फरारी या आदिवासी क्रांतिकारकाने केलेल्या संघर्षाचे, लढ्याचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे. कादंबरीत आदिवासींचे सांस्कृतिक जीवन, त्यांच्या मालकीचे जल, जमीन, जंगल, जीवनमूल्य यांच्या संरक्षणासाठी संघर्ष अभिव्यक्त झालेला आहे. या कादंबरी विषयी डॉ. संजय लोहकरे आपले विचार मांडतात की, “मावची, कोकणा समाजातील सामाजिक संघर्ष, विविध स्थळांचे संदर्भ, याबरोबरच राजा रावण, डोंगऱ्यादेव, झाकराबारीची दंतकथा, कणसऱ्या देवी, कालकामाता अशा विविध मिथकांचे संदर्भ कादंबरीत येतात. या कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आदिवासी संस्कृतीची जी स्वतःची वाङ्मय परंपरा आहे, ते लोकसाहित्यातून लिखित साहित्यात संक्रमित होताना दिसते. उदाहरणार्थ या कादंबरीतील विविध लोकगीते, लोकपरंपरा, त्यात अस्सल देशीपण आहे. त्यातून आदिवासींच्या जगाचा समग्रपणे शोध घेतला आहे.”[२] कादंबरीतून आदिवासींच्या मूळ प्रथा-परंपरा, निसर्गाशी असलेले नाते, त्यांच्या झाडा-पाण्या-माती-डोंगरात असणाऱ्या देवदेवता आणि त्यांची जीवनमूल्ये कादंबरीत मोठ्या ताकदीने प्रकट झालेल्या आहेत. आदिवासींचा एक क्रांतिमय इतिहास आहे. ब्रिटीश सरकार, अन्यायी शाहू लोक, शोषणकर्ते सावकार यांच्या विरोधात आदिवासींनी संघर्ष केला आहे, त्यांच्या विरोधात बंड केले आहे. याचा प्रतिनिधी या कादंबरीत भिवा नावाने आपल्याला पहावयास मिळतो. भिवा बरोबर त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक हे सारेच अन्यायी व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करतात. यातून भिवाची क्रांतिकारकता, सामर्थ्य दिसून येते. वर्तमानकाळात आदिवासींना आपल्या पूर्वजांनी केलेल्या संघर्षाच्या, लढ्याच्या इतिहासाची जाणीव करून आदिवासींच्या जीवनात अस्मिता निर्माण करणे, आत्मभान जागे करणे आणि त्या निमित्ताने शोषणकारी व्यवस्थेच्या विरोधात संघटन उभे करण्याच्या दृष्टीने ‘भिवा फरारी’ कादंबरी महत्त्वपूर्ण ठरते.

‘डुबू डुबुंग च्याय च्याय’ या दीपककुमार वळवी यांनी लिहिलेल्या कादंबरीत सातपुड्यातील भिल्ल आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन प्रकट झाले आहे. कादंबरीत होळी उत्सव, लग्न उत्सव, देज पद्धत, उत्सवातील दारूचे महत्त्व, वेगवेगळ्या समजुती, डाकीणविषयक अंधश्रद्धा, मर्तिक विधी-दिवसकार्य, आदिवासींची कुलदैवत याहामोगीविषयक श्रद्धा, निसर्गानुरूप जीवनशैली व मासेमारीसारखे व्यवसाय, आश्रमशाळांची वाईट स्थिती, आदिवासींचे दारिद्र्य, मजुरीसाठी गाव सोडून इतरत्र करावी लागणारी भटकंती, आदिवासींच्या विकास योजनांमध्ये होणारा भ्रष्टाचार, शोषणकारी व्यवस्थेच्या विरोधात आदिवासी विद्यार्थ्यांच्या तरुणांच्या जागृतीचे कार्य, पुढाऱ्यांची फसवी आश्वासने, धर्मांतर असे अनेक संदर्भ या छोटेखानी कादंबरीत आलेले आहेत. कादंबरीत आदिवासींच्या जीवनातील अनेक पारंपरिक सांस्कृतिक गोष्टी आल्या आहेत. कादंबरीतील सेगू आणि नमू या आदिवासी जोडप्याला तोपती नदीवर धरण बांधले जाते, त्यामुळे आपल्या बापजाद्याकडून मिळालेली शेती, गाव सोडून विस्थापित व्हावे लागते. त्यामुळे ते नवलपूर या नव्याने उभ्या राहिलेल्या गावी राहावे लागते. त्यानंतर सेगूच्या पुढच्या पिढीला म्हणजे त्यांच्या मुलांना फॉरेस्ट खात्याचे अधिकारी पक्षी-प्राण्यांच्या संरक्षणाचे कारण देऊन त्या भागातून हाकलतात. यावरून देशाच्या विकासाच्या नावाने आदिवासी कसे उद्ध्वस्त होतात याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत आलेले आहे.

तुकाराम चौधरी यांच्या ‘पाड्यावरचा टिल्ल्या’ या कादंबरीत डोंगरीपाडा या गावातील एका सर्वसामान्य आदिवासी युवकाचा म्हणजेच टिल्ल्याचा जीवनसंघर्ष अभिव्यक्त झाला आहे. त्या निमित्ताने डोंगरीपाडा गावाच्या सभोवतालच्या परिसरात वेगवेगळ्या गावांमध्ये वास्तव्य करीत असलेल्या आदिवासी लोकांचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन आविष्कृत झालेले आहे. विशेषतः आदिवासी समाजावर असलेल्या कादंबरीत फार क्वचितपणे उच्च शिक्षित नायक किंवा प्रमुख व्यक्तिरेखा म्हणून आलेले आहेत. त्यात या कादंबरीतील प्रतिकूल परिस्थितीत, प्रचंड संघर्ष करीत उच्च शिक्षण घेऊन शिक्षक झालेल्या टिल्ल्याचा समावेश होतो, ही नक्कीच आदिवासी समाज आणि आदिवासी साहित्यासाठी आश्वासक बाब म्हणता येईल. कादंबरीबाबत

डॉ.सुलतान पवार आपल्या आदिवासी कादंबरी : आशय आणि अभिव्यक्ती या ग्रंथात लिहितात की, “प्रामुख्याने मराठी कादंबरी वाङ्मयात दोन-चार कादंबऱ्या सोडल्या तर त्यामध्ये शिक्षण हा विषय क्वचित आलेला आहे. आणि त्यात ज्या आदिवासी व्यक्तिरेखा आलेल्या आहेत, त्यांना शिक्षणाचा फारसा स्पर्शही झालेला नाही. त्या दृष्टीने ‘पाड्यावरचा टिल्ल्या’ या कादंबरीचे महत्त्व यासाठी आहे की, ही कादंबरी शिक्षणावर केंद्रित झालेली आहे. सबंध कादंबरीभर नायकाच्या शिक्षणाच्या व नोकरीच्या निमित्ताने आश्रमशाळा, विद्यार्थ्यांचे जीवन, कॉलेजचे जीवन, शिक्षक या बाबी अग्रक्रमाने व्यक्त झाल्या आहेत. कादंबरीचा नायक टिल्ल्या प्रतिकूल परिस्थितीत प्रचंड संघर्ष करीत उच्च शिक्षण घेऊन स्वत:च्या आयुष्याला दिशा देतो. आजच्या अत्यंत वेगानं बदलत्या काळात आदिवासी युवक उच्च शिक्षण घेऊ पाहतो आहे. त्या शिक्षणाच्या बळावर शेकडो वर्षांची अज्ञानाची परंपरा खंडित करण्यासाठी प्रयत्न करतो आहे, त्याचे प्रतिनिधित्व कादंबरीचा नायक टिल्ल्या करतो आहे, याचे प्रत्यंतर येते.”[3] यावरून ‘पाड्यावरचा टिल्ल्या’ या कादंबरीचे महत्त्व अधोरेखित होते.

देवदत्त चौधरी यांच्या ‘पळसचोंड’ कादंबरीमध्ये खऱ्या अर्थाने डोंगरदऱ्या, जंगलाच्या सान्निध्यात असलेल्या पळसचोंड या गावाची कहाणी अभिव्यक्त झाली आहे. गावातील लोकांच्या सबंध वर्षभराच्या दैनंदिन जीवनाबरोबरच त्यांची सामाजिक परिस्थिती, लोकसंस्कृती आणि निसर्गनिष्ठ जीवनशैली प्रत्ययकारीरित्या आविष्कृत झाली आहे. महाद्या आणि आंजी यांच्यातील प्रेम, महाद्याची त्याच्या मित्रांबरोबर रात्रीबेरात्री शिकार-मासेमारीसाठी राना-शेतशिवारातील भटकंती, गावात साजरा झालेले भोवाडा-आखात्री-होळीचे उत्सव, महाद्या-आंजीचं लग्न, लक्ष्मणराव यांची गावातल्या गरीब लोकांसाठी केलेली मदत, गावातल्या गरीब व अज्ञानी लोकांचा फायदा घेऊन भिवा पाटील यांनी साधलेला स्वार्थ आणि शेवटी कालौघात बदलत्या परिस्थितीत पळसचोंड गावात होत असलेल्या आर्थिक विकासाबरोबरच गावात शिरलेले राजकारण, भ्रष्टाचार, स्वार्थीपणा, यांत्रिकपणा व त्या निमित्ताने हरवत गेलेली आदिवासींची जीवनमूल्ये, निसर्गनिष्ठ जीवनशैली व लोकपरंपरा ही कादंबरीची आशयसूत्रे सांगता येतात.

निवृत्ती धोंगडे आणि शांताराम गजे या लेखकांनी ‘बाडगीची माची’ या कादंबरीत क्रांतिवीर राघोजी भांगरे यांनी केलेल्या क्रांतिसंघर्षाचे रेखाटन केलेले आहे. इतिहासात ब्रिटीशांच्या विरोधात राघोजी भांगरे यांनी आदिवासीचे शोषण करणारे ब्रिटीश, सावकार यांच्या विरोधात निकराचा लढा दिलेला आहे. या क्रांतिवीराने आपल्या साथीदारांच्या साहाय्याने नाशिक, नगर, पुणे, ठाणेच्या परिसरात शोषणकर्ते, अन्यायी सावकारांच्या घरी धाडी टाकल्या. ‘गनिमी काव्या’च्या युद्धतंत्राने बलाढ्य ब्रिटीशांशी संघर्ष केला. या इतिहासातल्या पहिल्या क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या जीवनावर, संघर्षावर, त्याने केलेल्या गरीब आदिवासींसाठी केलेल्या कार्यावर आधारित ‘बाडगीची माची’ ही चरित्रात्मक कादंबरी होय.

बाबुलाल नाईक यांच्या ‘शिबली’ या कादंबरीत नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल आदिवासींचे जगणे येते. साधारणतः आदिवासी समाजातल्या अनिष्ट प्रथा असलेल्या डाकीण या प्रथेमुळे आदिवासी महिलांची अवहेलना होत आलेली आहे. एका बाजूला आदिवासींमध्ये स्त्रीच्या संदर्भात चांगला दर्जा असला तरी अंधश्रद्धेमुळे गावात, पाड्यात आदिवासी स्त्रीला जगणे मुश्कील होऊन जाते. हीच वेदना आणि डाकीणविषयक चुकीच्या समजुतीमुळे निर्माण होणारी समस्या ‘शिबली’मध्ये व्यक्त झाली आहे. सातपुड्यातील भिल्ल आदिवासींच्या जीवनातील दारिद्र्य, त्यांचे दुःख, समाजातील अंधश्रद्धा, लोकसमज, गावागावत होणारा भ्रष्टाचार, जमीनदार-सावकारांनी अधिकाऱ्यांनी आदिवासींचे केलेले शोषण, आदिवासी मुलींवरील अन्याय, ठेकेदारी अशा अनेक विषयांवर कादंबरीकाराने परखडपणे भाष्य केले आहे. दिवशा आणि दिवली आणि त्यांची मुलगी शिबली या प्रमुख व्यक्तिरेखांच्या जीवनातील वंचितता, अगतिकता, त्यांची गरिबी, वेदना, चांगले जगण्यासाठी त्यांची धडपड, एकमेकांवरील विश्वास, आस्था या बाबी आलेल्या आहेत. या निमित्ताने सातपुड्यातील आदिवासींच्या जीवनातील संघर्ष, अंधश्रद्धा, भ्रामक समजुती, लोकसमज याचे चित्रण आलेले आहे. आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे, मजुरी करणाऱ्या आदिवासींचे शोषण असे अनेक संदर्भ यात प्रकट झालेले आहेत.

डॉ.माधव गावित यांची ‘घोंगडा’ कादंबरी असून, त्यात नाशिक जिल्हा आणि डांग जिल्हाच्या सीमावर्ती असलेल्या डोंगराळ परिसरातील आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक जीवनाचा आविष्कार पाहावयास मिळतो. आदिवासींची निसर्गनिष्ठ जीवनशैली, त्यांचे सणोत्सव, डोंगऱ्यादेवाचा उत्सव, ‘पेन’ची पद्धत, लग्नपद्धती याबरोबरच आदिवासी माणसाचा संघर्ष, त्यांची उपासमारी, दारिद्र्य याचे वास्तववादी चित्रण कादंबरीत आलेले आहे. कादंबरीत नवशी आणि बुधाच्या कुटुंबाच्या जीवनसंघर्षाबरोबर डोंगरदऱ्यात असलेल्या सावरी नावाच्या गावाच्या आणि परिसराच्या आदिवासी लोकांचे जगणे अभिव्यक्त झाले आहे. कादंबरीच्या पानापानांवर निसर्गाचे वर्णन येते यावरून आदिवासींचे निसर्गाशी असलेले घनिष्ठ नातेसंबंध लक्षात येते. कादंबरीविषयी डॉ.सखाराम डाखोरे लिहितात की, “डॉ.माधव ह. गावित यांची लेखनशैली वाचकाला खिळवून ठेवतानाच कादंबरीतील घटना-प्रसंगांना सूक्ष्मपणे मांडणारी आहे. आदिवासी समाजातील रूढीपरंपरा श्रद्धा-अंधश्रद्धा भूताखेतांवरील विश्वास, माणसांचा प्रामाणिकपणा, भगतांवरील श्रद्धा, लग्नपद्धत, सणसमारंभ, देवता, गोरगरिबांच्या लेखी बाईंना होणारा सासुरवास या सर्व बाबींना लेखकांनी मोठ्या ताकदीने शब्दबद्ध केले आहे. . . कादंबरीत कोकणी बोलीभाषेतील संवादामुळे त्यामध्ये एक प्रकारचा जिवंतपणा आलेला आहे या वैशिष्ट्यपूर्ण बोलीभाषेतील शब्दांमुळे आदिवासींच्या जीवनातील विविधता व नाविन्यपूर्णता अभिव्यक्त झालेली आहे. बोलीभाषेचे संवाद आणि काही प्रमाणात निवेदनातून लेखन झाल्याने ही कादंबरी महत्त्वाची ठरते.”[४] कादंबरीचे शीर्षकही मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहे. ‘घोंगडा’शी आदिवासींचे एक भावनिक, सांस्कृतिक नाते आहे. पावसाळ्यात वापरला जाणाऱ्या घोंगड्याशी प्रत्येक आदिवासीचा संबध येतो. कादंबरीचा नायक बुधा घोंगडा बनवतो. आणि शेवटी घोंगडा बनवण्याची परंपरा मुलाकडे सोपवतो. यातून आदिवासींचे पारंपरिक जीवनशैलीचे, प्रथेचे महत्त्व अधोरेखित होते. कादंबरीत कोकणी-डांगी बोलीभाषेचा वापर केलेला असून, त्यातून आदिवासींचे सांस्कृतिक जगणे व्यक्त झाले आहे. जागतिकीकरण, आधुनिक जीवनाच्या स्वीकारामुळे होणाऱ्या बदलात बोलीभाषा नष्ट

होत आहेत, त्या अनुषंगाने कादंबरीत संवाद आणि निवेदनातही बोलीभाषेचा उत्स्फुर्तपणे आविष्कार होतो, हे कादंबरीचे सामर्थ्य असल्याचे लक्षात येते.

आदिवासी कवी आणि समीक्षक विनोद कुमरे यांची ‘कोयतूर’ ही कादंबरी असून यात गोंड आदिवासी समाजाचे चित्रण आलेले आहे. या कादंबरीत आदिवासींचे अस्तित्व, आत्मभान, त्यांची अस्मिता यांचे अधोरेखन झालेले आहे. समीक्षक प्रो.शैलेंद्र लेंडे यांचे कादंबरीच्या पब्लंवर विचार व्यक्त झाले आहे, ते हे की, “अनेक शतकांपासून उपेक्षित व वंचित गोंड आदिवासींच्या जीवनरूपांना, जीवनसमस्यांना ही कादंबरी कधी चर्चात्मक, तर कधी चिंतनात्मक पद्धतीने हात घालते आणि त्या समस्यांच्या निराकारणाचे मार्गदेखील अधिक सुस्पष्ट करू पाहते. भारतीय समाजसंरचनेमध्ये सर्वार्थाने उपेक्षित असलेल्या गोंड या आदिवासी जीवनाचा असा प्रदीर्घ पट डॉ.विनोद कुमरे यांच्या ‘कोयतूर’ या कादंबरीच्या रूपातून मराठी कादंबरीमध्ये पहिल्यांदाच इतक्या कलात्मक, प्रत्ययकारी व प्रभावी पद्धतीने प्रगट झालेला आहे.”[१] कादंबरीत समृद्ध प्राचीन इतिहास असलेल्या कोयतूर आदिवासींचा आदिवासींची झालेली अवनती, खाजगीकरण-जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासींच्या जल-जमीन-जंगलावर होत असलेला कब्जा, आदिवासींमधील सांस्कृतीकीकरण, प्रस्थापित व्यवस्थेने चालवलेले शोषण या पार्श्वभूमीवर कादंबरीचा नायक कांता सर दुर्गम भागातील आपल्या आदिवासी बांधवांच्या विकासासाठी योजना राबविण्यासाठी प्रयत्न करतो. त्यांच्यात आत्मभान निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. कादंबरीकार डॉ.विनोद कुमरे सामाजिक दृष्टीने आणि आदिवासींचा विकास व्हावा यासाठी ते वेगवेगळ्या आदिवासी समाजाच्या, साहित्याच्या चळवळीत कार्यरत आहेत. हाच चळवळीचा विचार, आणि आदिवासींच्या विकासासाठी केलेल्या कार्याचे संदर्भ त्यांच्या ‘कोयतूर’ या कादंबरीत सापडतात.

सुनील गायकवाड यांनी कथालेखानात, भिल्ली बोलीभाषा संशोधनात महत्वाची कामगिरी बजावली आहे. त्यांनी कादंबरीत साहित्य प्रकारही हाताळून त्यात त्यांनी ‘मासोली’ या कादंबरीतून आदिवासी जीवनाचे वास्तववादी चित्रण केले आहे. विशेषतः कादंबरीच्या शेवटी भिल्ली बोली भाषा आणि मराठीत एक छोटेखानी शब्दकोश दिलेला आहे. ‘मासोली’ या

कादंबरीच्या संदर्भात डॉ.सखाराम डाखोरे लिहितात की, "सुप्रसिद्ध आदिवासी साहित्यिक सुनील गायकवाड यांची 'मासोली' ही आदिवासी समाजजीवनावर आणि आदिवासींच्या आधुनिक प्रश्नांना भिडणारी सशक्त कादंबरी आहे. तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीच्या माध्यमातून कादंबरीकाराने आदिवासी विरुध्द बदलता भवताल असा वास्तव संघर्ष उभा केला आहे. आदिवासी हा जल-जंगल-जमिनीचा मूळ मालक असूनही आज त्याला विस्थापितांचे जीवन जगावे लागत आहे, विविध धार्मिक संघटना त्याच्यावर आपला धर्म लादू पाहत आहेत, अनेक प्रकल्पांच्या नावाखाली त्याच्या प्राचीन सांस्कृतिक वारशाला नष्ट केले जात आहे, एकूणच आदिवासींच्या निसर्गमय जगण्याला ही व्यवस्था सुरुंग लावू पाहत आहे, ह्या आणि अशा अनेक प्रश्नांना 'मासोली' कादंबरी भिडताना दिसते."[६] 'मासोली' कादंबरीचे कथासूत्र गडद नदीच्या परिसरातील जांभली गावाच्या कुंदा नावाच्या नायिकेभोवती केंद्रित झालेली आहे. कुंदा ही धारिष्ट्य दाखवणारी असून; तिच्या वाट्याला आलेल्या रिकामटेकड्यांना अद्दल घडवणारी, तशीच संकटकाळात मदत करणारी, कच्ची खेकड खाणारी अशी दमदार, भक्कम व्यक्तिमत्त्व असलेली व्यक्तिरेखा म्हणून तिच्यात अस्सल आदिवासी माणसाची गुणवैशिष्ट्ये दिसून येतात. मुळातच आदिवासी समाजातील स्त्रिया ह्या कष्टाळू, आलेल्या संकटाला सामोऱ्या जाणाऱ्या, शेतात-मजुरीत किंवा कुठल्याही कामात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून जगणाऱ्या स्त्रिया असतात. बऱ्याच वेळेस कुटुंबाची जबाबदारी स्वत: स्वीकारणाऱ्या आदिवासी स्त्रिया सर्वत्र दिसून येतात. एक प्रकारे या आदिवासी स्त्रीचे प्रतिनिधित्व या कादंबरीतील कुंदा ही नायिका करताना प्रकर्षाने जाणवते. कादंबरीत भिल्ल आदिवासींच्या निसर्गातल्या देवदेवतांच्या कल्पना, देवांच्या संदर्भातील लोककथा, होळी, भोंगऱ्या बाजार, उत्सवाच्या प्रसंगी देहभान हरपून आदिवासींचे नृत्य, कोरोना काळातील लॉकडाऊनचे व कोरानाचे परिणाम, राजकारण, स्वार्थी पुढारी, सांस्कृतीकीकरण, धर्मांतर आधुनिक जीवनाचा आदिवासींवर होणारा परिणाम आणि निसर्गाची विविध प्रकारची रूपे, प्राणी यांचे वास्तववादी आणि प्रत्ययकारी चित्रण कादंबरीकाराने केलेले आहे. कादंबरीचे निवेदन मराठी असून व्यक्तिरेखांच्या संवादातून बोलीभाषेचा आविष्कार झाला आहे, त्यामुळे संवादाची भाषा परिणामकारक ठरली आहे.

डॉ.कृष्णा भवारी यांच्या ‘इधोस’ या कादंबरीत आदिवासींचे वास्तवदर्शी चित्रण झालेले आहे. लेखक स्वतः आदिवासी समाजाचे असल्याने, आदिवासींच्या संस्कृतीची त्यांना चांगल्या प्रकारे जाण आहे. परिणामी त्यांनी आदिवासींच्या जीवनातील जीवनमूल्ये, सणोत्सव, प्रथापरंपरा लग्नसमारंभ, शिकार, मासेमारी या त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनाबरोबरच त्यांच्या जीवनातील गरिबी, बेकारी, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, अज्ञान आणि त्यांचे होणारे विस्थापन हे विषय कादंबरीत अभिव्यक्त झाले आहेत. देशाच्या विकासाच्या नावाने आदिवासींचे होणारे विस्थापन हे विषन्न करणारे आहे. अल्पसंतुष्ट, कमी गरजा, समाधानी जीवन व्यतीत करणाऱ्या आदिवासींच्या मूलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत, त्यामुळे स्वतःला जंगलचा राजा म्हणवणाऱ्या आदिवासींची अवस्था वाईट झाल्याचे चित्रण कादंबरीत आलेले आहे.

आदिवासी कादंबरीकारांच्या समोरील आव्हाने -

२१ व्या शतकामध्ये अनेक आदिवासी साहित्यकरांनी कादंबऱ्या लिहिल्या, तरीही त्यांची संख्या समाधानकारक नाही. संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या आदिवासी कादंबरी विकसित होणे आवश्यक आहे. आजच्या काळात आदिवासी कादंबरीतून आदिवासींच्या जीवनातील अस्मिता, आत्मभान, आत्मशोध याची जाणीव अभिव्यक्त होऊ लागली. आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा सूक्ष्मपणे वेध घेण्याचा आणि आपल्या समाजाच्या वेदनेचा शोध घेण्याचा प्रयत्न विशेषतः आदिवासी कादंबरीतून दिसून येतो. तरीही आदिवासी साहित्यकारांनी कादंबरीतून कोणत्या विषयांचा अविष्कार करण्याची गरज आहे, या विषयी डॉ.सुलतान पवार आपल्या ‘आदिवासी : समाज, संस्कृती, साहित्य आणि भाषा’ ग्रंथात लिहितात की, “आदिवासींच्या जीवनातील शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या, ज्या अजूनही सुटलेल्या नाहीत अशा समस्या आणि नव्याने निर्माण झालेल्या आदिवासींच्या समोरचे प्रश्न या साऱ्यांचे एक मोठे आव्हान आदिवासी कादंबरीकारांच्यासमोर आहे. सांस्कृतिकीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. धर्मांतरणाची प्रक्रिया अव्याहतपणे सुरू आहे. देशाच्या विकासाच्या नावाखाली आदिवासींच्या

मालकीच्या जल, जमीन, जंगलावर ताबा घेतला जात आहे. त्यामुळे त्यांचे विस्थापन होत आहे, आधीच थोडी थोडी जमीन असल्याने त्यांचे भूमिहीन होऊ लागले आहेत. मूलभूत गरजा भागवण्याठी त्यांना आपला प्रांत सोडून रोजगारासाठी दुसऱ्या भागात स्थलांतर करावे लागत आहे. ज्याठिकाणी त्यांना जगण्याच्या सुविधा नाहीत, त्यांच्या मुलांना शिक्षण नाही. बांधकाम, ऊसतोड, रस्त्यावरील कामे, शेतातील कष्टाची कामे अशा प्रचंड दमवणाऱ्या शारीर कामात आदिवासी अडकला असून; त्यातून त्याची सुटका होताना दिसत नाही. पुन्हा कामाच्या ठिकाणी आदिवासींवर सहजतेने अन्याय-अत्याचाराला सामोरे जावे लागते. आदिवासी स्त्रीवर शारीर-मानसिक शोषण होते. आश्रमशाळांवर प्रचंड पैसा खर्चूनही तिथे शिकणाऱ्या मुलांची स्थिती वाईट असते. मुलींवर अन्याय होतो. आदिवासींच्या विकासाच्या योजनांमध्ये होणारा भ्रष्टाचार, आदिवासींमध्ये शैक्षणिक क्षेत्रात संख्यात्मक वाढ होत असली तरी गुणात्मक वाढ होताना दिसत नाही. यासाठी पालक, नोकरदार, शिक्षक, अधिकारी, लोकप्रतिनिधी सारेच घटक जबाबदार आहेत. कुपोषण अजूनही हटायला तयार नाही. एका बाजूला आधुनिक जीवनमान स्वीकारताना आणि शैक्षणिक, सामाजिक विकास होताना दुसऱ्या आदिवासींच्या मूळ प्रथा परंपरा, त्यांचे भाषिक वैभव हे सारेच नाहीसे होण्याच्या मार्गाला लागले आहेत, त्यांचे निसर्गाशी असलेले नाते नाहीसे होत आहे. त्यांची श्रेष्ठ जीवनमूल्ये हरवत आहेत, असे शेकडो प्रकारचे संदर्भ कादंबरीत कलात्मकदृष्ट्या प्रभावीपणे येण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने आदिवासी कादंबरीकारांनी जबाबदारी घेणे आवश्यक आहे. आदिवासी माणसांच्या जाणिवा, संवेदना, भावना, कल्पना, त्यांचा दृष्टीकोन, त्याचे विचार ह्या साऱ्याच गोष्टी प्रबळपणे आविष्कृत होणे आवश्यक आहे."[७] या अनुषंगाने भविष्यात आदिवासी साहित्यकारांनी वाटचाल करणे आवश्यक आहे.

संदर्भ -

१. तुमराम विनायक, ‘आदिवासी साहित्य : दिशा आणि दर्शन’, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, पहिली आवृत्ती २०१२, पृ.६३.

२. लोहकरे डॉ.संजय, ‘आदिवासी साहित्य आणि कला संस्कृती, अथर्व पब्लिकेशन्स जळगाव, पहिली आवृत्ती २०२२, पृ.३९.

३. पवार डॉ.सुलतान, ‘आदिवासी कादंबरी : आशय आणि अभिव्यक्ती’, विजय प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती २०२४, पृ.२०३

४. गावित डॉ.माधव, ‘घोंगडा’, मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती, पहिली आवृत्ती २०२२, पृ.२३.

५. कुमरे विनोद, ‘कोयतूर’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २०२०. पृ.मुखपृष्ठ.

६. गायकवाड सुनील, ‘मासोली’, सुगावा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती २०२१, पृ.४.

७. पवार डॉ.सुलतान, ‘आदिवासी : समाज, संस्कृती, साहित्य आणि भाषा’, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, पहिली आवृत्ती २०२४, पृ.१७७-१७८.